


दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे

या गुढी पाडव्याला आपल्या घराला द्या नवीन आणि आधुनिक साज!
इंटेरिअर डिझायनर श्रेया निलाखे
घर, फ्लॅट व ऑफिससाठी आकर्षक आणि आधुनिक इंटेरिअर डिझाईन.

- आधुनिक व मिनिमल डिझाईन
- स्मार्ट स्पेस प्लॅनिंग
- बजेटमध्ये सुंदर इंटेरिअर सोल्युशन्स

संपर्क: 75-59-26-16-75

वर्ष ५ । अंक १६८ । शनिवार २१ मार्च २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## अभिषेक कळमकर कांडाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे

**नोकरीचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार । गुन्हा दाखल झाल्यापासून फरार**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर शहराचा माजी महापौर तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर याने केलेल्या कांडाचा तपास आता स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडे (एलसीबी) सोपविण्यात आला आहे. पंचवीसवर्षीय तरुणीच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाल्यानंतर महिना उलटला तरी अभिषेक अद्याप फरारच असून, त्याने पोलिसांना पारनेरमध्ये एकदा गुंगारा दिल्याचेही सांगितले जात आहे.

शाळेत नोकरी लावण्याचे आमिष दाखवून अभिषेक कळमकर याने पीडित तरुणीशी संपर्क साधला. त्यानंतर नगर शहरात तसेच पुणे जिल्ह्यातील शिरूर येथे एका लॉजवर बोलावून अत्याचार केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी सुरुवातीला एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. परंतु यात माहिती-तंत्रज्ञान कायद्याचे कलम असल्याने हा तपास तोफखाना पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला. या प्रकाराचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली होती. दरम्यान, गेल्या महिनाभरापासून अभिषेक पोलिसांना सापडत नसल्याने मागील आठवड्यात संबंधित तरुणीने आत्मदहनाचा इशारा दिला होता. त्यामुळे या प्रकरणाचा तपास आता स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडे सोपविण्यात आला आहे.

## शहरात रमजान ईद उत्साहात साजरी

**धार्मिक एकात्मता, शांतता व देशाच्या समृद्धीसाठी विशेष प्रार्थना**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** शहरात रमजान ईद (ईद-उल-फित्र) शनिवारी (दि. २१ मार्च) मोठ्या उत्साहात आणि शांततेच्या वातावरणात साजरी करण्यात आली. रमजान महिन्यातील तीस दिवसांच्या रोजा (उपवास) पूर्ण झाल्यानंतर शुक्रवारी सायंकाळी चंद्रदर्शन झाल्याने शनिवारी ईद साजरी करण्यात आली. या पार्श्वभूमीवर शहरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. ■ पान ४ वर

**संगमनेरमध्ये विद्यार्थिनीवर ॲसिड हल्ला**

## आरोपीला तात्काळ अटक करा – आमदार संग्राम जगताप

**शाळा–महाविद्यालयांना पोलीस संरक्षण द्या; अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा । खाकीचा धाक संपला का? विद्यार्थिनींच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथे इयत्ता सहावीमध्ये शिकणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीवर झालेल्या अमानुष ॲसिड हल्ल्याच्या घटनेने संपूर्ण अहिल्यानगर जिल्हा हादरला असून या घटनेमुळे संतापाची तीव्र लाट उसळली आहे. या प्रकरणातील आरोपीला तात्काळ अटक करण्यात यावी तसेच जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी पोलीस संरक्षण देण्यात यावे, अशी ठाम व आक्रमक मागणी आमदार संग्राम जगताप यांनी केली आहे.

या संदर्भात त्यांनी अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांना निवेदन सादर करत प्रशासनाला जाब विचारला. तसेच येत्या बुधवारपर्यंत आरोपी अटक न झाल्यास सराफ सुवर्णकार संघटनेच्या माध्यमातून तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा देत प्रशासनाला इशारा दिला आहे.

या वेळी मयूर कुलथे, प्रमोद बोऱ्हाडे, प्रकाश लोळगे, विजय देवळालीकर, अनिकेत बागडे, आनंद नांदूरकर, राहुल कुलथे, संतोष देडगावकर, वैजनाथ चिंतामणी, विजय कुलथे, प्रकाश हिंगणगावकर, श्याम मुंडलिक, विजय जगदाळे आदींसह अनेक नागरिक व पदाधिकारी उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप यांनी निवेदनात तीव्र शब्दांत संताप व्यक्त करत म्हटले की,

''वडगाव पान येथे सहा वर्षीय मुलीवर ॲसिड हल्ला होणे ही अत्यंत गंभीर आणि लज्जास्पद बाब आहे. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्याची मान शरमेने खाली गेली आहे. या घटनेला संबंधित पोलिस यंत्रणा व प्रशासन जबाबदार आहे.

त्यांनी पुढे नमूद केले की, जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था ढासळत चालली असून खाकीचा धाक उरलेला नाही. त्यामुळेच अशा विकृत प्रवृत्तींचे लोक निर्भयपणे गुन्हे करत असल्याचे चित्र दिसत आहे.

जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांमध्ये हजारो मुली व युवती शिक्षण घेत आहेत. भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी तातडीने ठोस उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे सांगत आमदार जगताप यांनी प्रशासनास पुढील सूचना केल्या – शाळा व महाविद्यालयांमध्ये नियमित गस्ती पथके नेमावीत, या गस्ती पथकांमध्ये महिला पोलिसांचा समावेश करावा, गस्ती पथकाच्या भेटींची नोंद ठेवण्यासाठी स्वतंत्र रजिस्टर ठेवावे, शाळा सुरू व सुटण्याच्या वेळेत विशेष पोलीस बंदोबस्त ठेवावा, प्रत्येक शाळा व महाविद्यालयात कायमस्वरूपी पोलीस नियुक्तीचा विचार करावा. तसेच या सर्व उपाययोजनांबाबत प्रशासनाने सविस्तर ■ पान ४ वर

## गोमांस विक्री करणारे चौघे झेंडीगेट परिसरातून ताब्यात

**कोतवालीच्या कारवाईत पाचशे किलो गोमांस जप्त**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर शहरातील झेंडीगेट परिसरात गोमांस विक्री करणा-या चौघांना कोतवाली पोलिसांनी जेरबंद केले आहे. या कारवाईत पाचशे किलो गोमांस जप्त करण्यात आले आहे.

दि.२० मार्च रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांना गोपनीय माहिती मिळाली की, नगर शहरातील झेंडीगेट परिसरातील बेपारी मोहल्ला येथील शहबाज कुरेशी याच्या घरामध्ये सुभेदार गल्ली झेंडीगेट येथे गोवंशीय जनावरांच्या मांसाची विक्री केली जात आहे. त्यानुसार पथकाने नमूद ठिकाणी जाऊन खात्री केली असता चौघाजण गोमांस विकताना आढळून आले. शहेबाज अब्दुल मजीद कुरेशी (वय २९ वर्षे),, शान अब्दुल मजीद कुरेशी (वय-२६ वर्षे), कैफ अब्दुल मजीद कुरेशी (वय- २२ वर्षे) व ऐनुर रफिक कुरशी (वय ३६ वर्षे, सर्व रा. बेपारी मोहल्ला आंबेडकर चौक, झेंडीगेट) अशी त्यांची नावे आहेत. ■ पान ४ वर

### पथकात यांचा सहभाग


**सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली कोतवालीचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड, पोसई प्रवीण पाटील, पोसई गणेश देशमुख, सफौ संतोष बनकर, पोहेकॉ दौंड, पोहेकॉ शेख, पोहेकॉ विशाल दळवी, पोहेकॉ विनोद बोरगे, पोहेकॉ वाकचौरे, पोहेकॉ राहुल शिंदे, मपोहेकॉ रोहिणी दरंदले, पोना विजय ठोंबरे पोकॉ/ दीपक रोहोकले, सत्यम शिंदे, अमोल गाढे, सूरज कदम, दत्तात्रय कोतकर, शिरीष तरटे, अतुल काजळे, राम हंडाळ, सचिन लोळगे, महेश पवार, रमेश शिंदे, अतुल लाटे. मपोकॉ/ पल्लवी रोहोकले यांच्या पथकाने केली.**

## इराणच्या राष्ट्राध्यक्षांशी मोदींचा संवाद

**सणासुदीच्या काळात मध्यपूर्वेत शांतता नांदण्याची व्यक्त केली आशा**

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था –** अमेरिका-इस्रायल-इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इराणच्या राष्ट्राध्यक्षांशी फोनवर संवाद साधला आणि त्यांना ईद व नवरोजच्या शुभेच्छा दिल्या. त्यांनी ही माहिती सोशल मीडियावर दिली. पंतप्रधानांनी लिहिले की, ''मी इराणचे राष्ट्राध्यक्ष डॉ. मसूद पाझाश्कियान यांच्याशी बोललो. या सणासुदीच्या काळात मध्य-पूर्वेत शांतता आणि स्थैर्य नांदेल, अशी आशा आम्ही व्यक्त केली.

इराणच्या राष्ट्राध्यक्षांशी झालेल्या संभाषणात, मोदींनी मध्य-पूर्वेतील महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवरील (जसे की तेल, वीज इत्यादी) हल्ल्यांचा निषेध केला, कारण त्याचा परिणाम त्या प्रदेशातील शांततेवर आणि जागतिक पुरवठ्यावर होतो. ते म्हणाले की, सुरळीत व्यापारासाठी सागरी मार्ग खुले आणि सुरक्षित ठेवणे महत्त्वाचे आहे. इराणमध्ये राहणाऱ्या भारतीयांच्या संरक्षणासाठी केलेल्या मदतीबद्दल त्यांनी इराणचे आभारही मानले.



दरम्यान, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी इराणी जनतेला नवरोजच्या शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले की, रशिया कठीण काळात इराणच्या पाठीशी उभा राहील आणि तो त्यांचा खरा मित्र आहे. रशियाने असेही म्हटले की, अमेरिका आणि इस्रायलच्या हल्ल्यांमुळे मध्य-पूर्वेतील परिस्थिती बिघडली आहे आणि त्यामुळे जागतिक तेल संकट आणखी गंभीर होऊ शकते. रशियाने इराणी नेते अली खामेनी यांच्या हत्येचा निषेधही केला.

## पाणी कुठवर मुरलंय कळू द्या

**भोंदूबाबा प्रकरणावरून उद्धव ठाकरेंचे वक्तव्य**



**मुंबई । वृत्तसंस्था –** अजून किती खालच्या पातळीवर आपण उतरणार आहोत. जादूटोणा विरोधी कायदा आपल्याकडे आहे, पण कायद्याचे पालन करणारेच त्यांच्या नादी लागणार असतील, तर त्यांच्यावर देखील कारवाई झाली पाहिजे. आम्ही महाराष्ट्रला पुढे नेणार आहोत, हा विषय घेऊन पुढे जातोय. पण, टाचण्या, लिंबाचा विषय समोर आलाय हे योग्य नाही. एपस्टीन फाईलमधून कोणाचं लक्ष उडू नये यासाठी सगळ्या गोष्टी सुरू आहेत. अनेक फोटो आणि नावं समोर येत आहेत, ज्यांचं कर्तृत्व नाही त्यांना असे मार्ग घ्यावे लागतात, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

मुंबईत एक्सपोर्ट इम्पोर्ट लॉजिस्टिक कोर्सचा शुभारंभ माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्याहस्ते करण्यात आला. या कार्यक्रमानंतर पत्रकार परिषदेच्या माध्यमातून त्यांनी लॉजिस्टिक कोर्स सुरू करण्याच्या उद्देशासह राज्यातील राजकीय परिस्थिती, भोंदूबाबा प्रकरणासह विविध विषयावर भाष्य केलं. राज्यात गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या भोंदूबाबा अशोक खरातसंदर्भात विचारलेल्या प्रश्नावरही उद्धव ठाकरेंनी उत्तर दिलं. ओम फट स्वाहा.. म्हणत राज्यातील भोंदूबाबांवर कारवाई झाली पाहिजे, असे आवाहन त्यांनी मुख्यमंत्र्यांना केले.

### माझे काहीही म्हणणे नाही, सगळ्यांची चौकशी करा

**महाविकास आघाडीच्या सरकारमध्येही या भोंदूबाबाला मदत झाली यासंदर्भातही उद्धव ठाकरेंनी भाष्य केलं. माझं काहीही म्हणणं नाही, तुम्ही सगळ्यांची चौकशी करा. कारण, पाणी कुठपर्यंत मुरलंय ते कळू द्या, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी महाविकास आघाडी सरकारच्या काळात भोंदू बाबाला पाणी देण्यासाठी केलेल्या मदतीवरूनही स्पष्टीकरण दिले. तसेच, यानिमित्ताने गावोगावी असलेल्या भोंदूबाबांवर कारवाई झाली पाहिजे, त्यांच्याकडे कुठल्याही पक्षाचा झेंडा असला तरी कारवाई झाली पाहिजे, अगदी ओम फट स्वाहा.. असे म्हणत उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्र्यांना आवाहन केले आहे.**

## महायुती सरकार शेतकऱ्यांच्या बाबतीत संवेदनशील – आमदार दाते सर

**नुकसानग्रस्त भागाची तात्काळ पाहणी व मदतीची हमी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी ढवळपुरी व परिसरातील वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतांची प्रत्यक्ष पाहणी करत प्रशासनाला तातडीच्या कार्यवाहीचे निर्देश दिले. तहसीलदार गायत्री सौंदाणे व तालुका कृषी अधिकारी गजानन घुले यांच्या उपस्थितीत त्यांनी शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान प्रत्यक्ष पाहून सबंधित अधिकाऱ्यांना सविस्तर अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यास सांगितले. यावेळी बोलताना आमदार दाते सर म्हणाले, ढोकी, धोत्रे, ढवळपुरी, वडगाव आमली, भाळवणी या भागात झालेल्या अचानक गारपीटीमुळे कांदा, वाटाणा, मका, कलिंगड, मिरची, टोमॅटो आदी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांनी लाखो रुपयांचा खर्च करून उभे केलेले पीक ऐन काढणीच्या वेळी नष्ट झाल्याने ते हवालदिल झाले आहेत. ''मी स्वतः शेतकरी कुटुंबातील असल्याने या वेदना मला पूर्णपणे समजतात. या संकटकाळात मी तुमच्या पाठीशी ठामपणे उभा आहे,'' असा दिलासादायक विश्वास त्यांनी शेतकऱ्यांना दिला.

घटनेची माहिती त्यांनी तत्काळ जिल्हाधिकारी यांना दिली असून प्रशासनानेही तातडीने हालचाल केली आहे. आज पाहणी करून उद्या अहवाल सादर केला जाणार असून त्यानंतर कृषी सहाय्यक, तलाठी व ग्रामसेवक प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतात जाऊन स्वतंत्र पंचनामे सुरू करतील. त्यानंतर शासनाकडे अहवाल सादर करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना ■ पान ४ वर

**शेतकऱ्यांना आवाहन करतो की, ''निसर्गाच्या आपत्तीवर आपले नियंत्रण नसले तरी महायुती सरकार शेतकऱ्यांबाबत संवेदनशील असून यापूर्वीही कर्जमाफी व अतिवृष्टीची मदत दिली आहे. याही वेळी शासन निश्चितच शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहील,'' असा विश्वास आम्हाला आहे.**

**आ. काशिनाथ दाते सर**
**(विधानसभा सदस्य)**

**अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे ढवळपुरी, ढोकी, धोत्रे, भाळवणी, वडगाव आमली, निघोज आदी गावांमध्ये कांदा, टरबूज, भाजीपाला, फळबागा व चाऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. आमदार काशिनाथ दाते सर यांच्या समवेत प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला आहे. उद्यापासून पुढील चार ते पाच दिवसांत सर्व नुकसानग्रस्त भागांचे सविस्तर पंचनामे पूर्ण केले जातील. त्यानंतर संपूर्ण अहवाल राज्य शासनाकडे तात्काळ पाठवण्यात येईल. शेतकऱ्यांना शक्य तितक्या लवकर मदत मिळावी यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे.**

**गजानन घुले,**
**तालुका कृषी अधिकारी पारनेर**

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगरच्या चि.वैभव व महेश यांना आयआयटीमध्ये घवघवीत यश



अहिल्यानगर - जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रम यांच्या जोरावर यशाचे शिखर गाठता येते, हे पुन्हा एकदा सिद्ध करत अहिल्यानगर शहरातील जनसेवक विजय घासे यांचे चि. वैभव आणि दत्तात्रय ढेपे यांचे चि. महेश या दोन विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत शिक्षण घेत असतानाही त्यांनी देशपातळीवर मानाचे स्थान मिळवले असून त्यांच्या या यशामुळे संपूर्ण जिल्ह्याचा अभिमान उंचावला आहे. चि. वैभव यांनी इकॉनॉमिक्स शाखेत ऑल इंडिया रँक ३४४ मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. स्पर्धात्मक परीक्षांमध्ये इतका उच्च क्रमांक मिळवणे ही मोठी कामगिरी मानली जाते. दुसरीकडे, चि. महेश यांनी केमिस्ट्रीमध्ये ऑल इंडिया रँक ८८३ तसेच बायोटेक्नॉलॉजीमध्ये २००१ क्रमांक मिळवत आपले स्थान पक्के केले आहे. या दोन्ही विद्यार्थ्यांनी मर्यादित साधनसामग्रीतूनही अभ्यासावर लक्ष केंद्रित करत यशाचा मार्ग निवडला. या दोन्ही विद्यार्थ्यांची कौटुंबिक परिस्थिती अत्यंत साधी असून अनेक अडचणींचा सामना करत त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. घरची आर्थिक परिस्थिती बेताची असतानाही त्यांनी कोणतीही सबब न देता सातत्याने अभ्यास केला. अनेक वेळा आवश्यक सुविधा उपलब्ध नसतानाही त्यांनी ध्येय डोळ्यासमोर ठेवून अविरत परिश्रम घेतले. त्यांच्या पालकांनीही प्रतिकूल परिस्थितीत मुलांच्या शिक्षणासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत त्यांना पाठबळ दिले. या यशानंतर अहिल्यानगर शहरात आनंदाचे वातावरण पसरले असून विविध स्तरातून विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. शिक्षक, मित्रपरिवार तसेच सामाजिक संस्थांकडून त्यांच्या कामगिरीचे कौतुक होत आहे. त्यांच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांना देखील प्रेरणा मिळणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. चि. वैभव आणि चि. महेश यांच्या या यशाने हे स्पष्ट केले आहे की, परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्द, मेहनत आणि योग्य दिशा असल्यास यश नक्की मिळते. त्यांच्या या यशामुळे भविष्यात आणखी विद्यार्थी मोठी स्वप्ने पाहण्यास आणि ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यास प्रेरित होतील.हे यश माझ्या प्रतिकूल परिस्थितीत प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष मदत करणार्या आणि परिवारातील सदस्यांना सर्मपित.असा विश्वास विजय घासे यांनी व्यक्त केला आहे.

### हिंदी चित्रपटातील विरह गीतांचा खास कार्यक्रम

अहिल्यानगर - शहरातील संगीतप्रेमींसाठी आनंदाची बातमी असून '९०' टॉकीज' आणि 'ऑरेंज इव्हेंट्स' यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदी चित्रपटातील सेन्टीमेंटल व विरह गीतांचा (दर्दभरे नगमे) विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम शनिवार, दिनांक २१ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता सावेडी येथील रावसाहेब पटवर्धन स्मारक, समर्थ शाळेसमोर आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात ९० च्या दशकातील अविस्मरणीय व हृदयस्पर्शी गीतांचा सुरेल आस्वाद रसिकांना घेता येणार आहे.विशेष म्हणजे हा कार्यक्रम सर्वांसाठी पूर्णतः मोफत ठेवण्यात आला आहे. त्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहून या सुरेल कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.अधिक माहितीसाठी श्री. जालिंदर शिंदे (मो. ९८८१७२५६९६) तसेच ॲड. सचिन चंदनशिव (मो. ८७९६८६५४८५) यांच्याशी संपर्क साधावा.

# प.पू माताजी श्रीनिर्मलादेवी यांचा १०३ वा वाढदिवस

प.पू माताजी श्रीनिर्मला देवी यांचा २१ मार्च २०२५ हा १०३ वा वाढदिवस मध्यप्रदेश येथील छिंदवाडा येथे मोठया प्रमाणात व भव्य स्वरूपात साजरा होत असून या कार्यक्रमा साठी १४० पेक्षा जास्त देशातील सहजयोगी तसेच भारतातील प्रत्येक राज्यातील सहजयोगी मोठया संख्येने उपस्थित होणार आहेत.

२१ मार्च १९२३ रोजी श्रीमाताजींचा जन्म मध्यप्रदेशातील छिंदवाडा या गावात झाला. भौगोलिकरित्या छिंदवाडा हे गाव भारताचा मध्यबिंदू आहे. तसेच २१ मार्च हा दिवस वर्षाचाही मध्यबिंदू १२ तास रात्र अन् १२ तास दिवस अशी ही तिथी. त्या दिवशी भरदुपारी १२ वाजेच्या सुमारास म्हणजे वर्षाच्या मध्यबिंदू असलेल्या दिवशी मध्यान्हावेळीचा त्यांच्या जन्माचा अनोखा योगायोग. देशभक्तीचा वारसा असणार्‍या त्यागी कुटुंबात श्रीनिर्मला देवी या लहानाच्या मोठ्या झाल्या. १९४२ च्या काळात महात्मा गांधी यांच्या भारत स्वातंत्र्य आंदोलनात त्या सक्रिय झाल्या. नागपूर येथे तिरंगा हातात घेऊन शस्त्रानिशी असलेल्या इंग्रजांचा त्यांनी धिरोदत्तपणे



प्रतिकार केला. पिताश्री बॅरिस्टर प्रसाद साळवे यांच्यासमवेत माताजींना गांधींचा सहवास लाभला. पाकिस्तानातील लाहोर येथे एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी चंद्रीकाप्रसाद श्रीवास्तव यांच्यासोबत ७ एप्रिल १९४७ रोजी त्या विवाहबध्द झाल्या. पढे श्रीवास्तव हे लालबहादूर शास्त्री पंतप्रधान झाल्यानंतर त्यांचे ज्येष्ठ सहसचिव म्हणून नियुक्त झाले. त्यानंतर शिपिंग कंपनीचे ते अध्यक्षही झाले. राष्ट्रीय पुर्ननिर्माण व विकास कार्यात तरूण पिढीच्या शक्तीचा उपयोग व्हावा यासाठी १९६१ मध्ये माताजींनी यूथ सोसायटी फॉर फिल्मस नावाची संस्था सुरू केली. नोकरीनिमित्त श्रीवास्तव यांनी जगभर भ्रमंती केली. या दाम्पत्याला दोन कन्यारत्नही झाले. त्यांच्यासोबत श्रीमाताजींही जगभर फिरल्या. त्या काळात यांनी जगाच्या पाठीवर प्रत्येक देशाची संस्कृती व जीवनशैलीचा अभ्यास केला.

पतीसोबत असतानाच जगातील पूर्वेकडील मानव समाजात संस्काराचा तर पश्चिमेकडे अंहकाराचा प्रश्न गंभीर बनत असल्याचे लक्षात आल्यानंतर या दोन्हीकडील लोकांनी श्रीमाताजी आत्म साक्षात्कार कसा देता येईल याबाबत विचार करत होत्या. त्याच सुमारास पतीच्या अपरोक्ष ४ मे १९७० रोजी नारगोळ येथे श्रीमाताजींना समुद्र किनाऱ्यावर रात्रभर ध्यानधारणा सुरू केली. ५ तारखेच्या पहाटेच्या सुमारास त्यांनी समस्त मानवाच्या कल्याणासाठी सहस्त्रार उघडले. तेथून पुढे त्यांनी सहजयोग ध्यानधारणेस सुरूवात केली. श्रीमाताजींनी जगभरात विश्वशांतीसाठी सहजयोग ध्यानसाधनेचे कार्य केले. अनेक देशांनी त्यांना सन्मानपत्र देऊन श्रीमाताजींचा गौरव केला.

फिलोडेल्फियात १५ ऑक्टोबर तर सीनसिनाटी या देशात १० सप्टेंबर हा दिवस श्रीमाताजी निर्मलादेवी दिवस म्हणून साजरा केला जातो. न्यूयार्कमध्ये श्रीमाताजींना तेथील पोलिसांनी मानवंदना देत स्वागत केल्याची नोंद दप्तरी आहे. १९८९ ते १९९४ सलग पाच वर्षे श्रीमाताजींना विश्वशांती मार्गदर्शनासाठी युनोने आमत्रंति केले होते. नुकतेच अमेरिका ने २१ मार्च हा दिवस प. पु. माताजी श्री निर्मला देवी दिवस म्हणून जाहीर केले ही सहजयोगा साठी व भारतासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

आज जगातील १४० देशापेक्षा जास्त देशात सहजयोग ध्यानसाधना करणारे साधक आहेत. अनेक देशात श्रीमाताजी यांचे आश्रम आहेत. देशातील प्रत्येक राज्यात व जिल्ह्यात सहजयोग ध्यानकेंद्रे अविरत सुरू असून ती विनामुल्य चालविली जातात. जातपातीचा भेदभाव न करता सर्व धर्मियांसाठी ही ध्यानसाधना खुली आहे.

– **संकलन– श्रीनिवास बोज्जा,** मा. जिल्हा समन्वयक, अहिल्यानगर जिल्हा सहजयोग समिती,
अहिल्यनगर. ९८९०८१२०००.

## 'चिमणी दिनानिमित्त' हरियाली संस्थेचा उपक्रम

### चिमण्या वाचवण्यासाठी कृतिशील काम करण्याचा विद्यार्थ्यांनी केला संकल्प



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** येथील हरियाली संस्थेच्या वतीने जागतिक चिमणी दिनानिमित्त गांधी मैदान येथील प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व विविध ठिकाणी चिमण्यांना पिण्याच्या पाण्याचे भांडे व खाण्यासाठी बर्ड फिडर लावून जागतिक चिमणी दिन साजरा करण्यात आला. या वेळी विद्यार्थ्यांनी चिमण्यांना वाचवण्यासाठी दैनंदिन पणे कृतिशील काम करण्याचा संकल्प केला.

यावेळी बोलताना हरियाली चे अध्यक्ष सुरेश खामकर यांनी सांगितले की शहरीकरणामुळे शहरे आणि गावांचा झपाट्याने विस्तार झाला आहे, ज्यामुळे चिमण्या घरटे आणि चारा शोधण्यासाठी ज्या नैसर्गिक अधिवासावर अवलंबून असतात ते नष्ट होत आहेत. हिरव्यागार जागांचे कॉंक्रीटच्या जंगलात रूपांतर झाल्यामुळे चिमण्यांना निवारा आणि अन्न देणारी झाडे, झुडपे आणि इतर वनस्पतींची उपलब्धता मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. कीटकनाशकांच्या मोठ्या प्रमाणात वापरामुळे चिमण्यांच्या संख्येवर हानिकारक परिणाम झाला आहे .तसेच वायू आणि ध्वनी प्रदूषण, चिमण्यांच्या संख्येत घट होण्यास कारणीभूत असलेला आणखी एक प्रमुख घटक आहे. म्हणून चिमण्यांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याकरिता पक्ष्यांची घरटी बांधा आणि ती तुमच्या बागेत ठेवा. स्थानिक वनस्पती लागवड करा. यामुळे चिमण्या आणि इतर पक्ष्यांना अन्न आणि निवारा मिळू शकतो. चिमण्यांसाठी सुरक्षित वातावरण सुनिश्चित करण्यासाठी तुमच्या बागेत कीटकनाशकांचा वापर कमीत कमी करा. चिमण्यांना अतिरिक्त अन्न स्रोत मिळावा म्हणून तुमच्या बागेत किंवा बाल्कनीत धान्य आणि पाण्याचे भांडे असलेले बर्ड फीडर ठेवा.

या प्रकारे कृतिशील काम करून चिमण्या वाचवण्याचे आवाहन खामकर यांनी केले. यावेळी विद्यालयातील प्राचार्य सुनील पंडित, श्री दिलीप रोकडे , अनिता सरोदे, सौ नंदा पवार, सौ श्रुती पेंटा, रोहित सुंबे, विजय गरड, विलास बुगे, रवी केळगंद्रे, शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी उपस्थित होते.

## पेमराज सारडा महाविद्यालयांतर्गत गुणवत्ता हमी कक्षाद्वारे चर्चासत्र संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पेमराज सारडा महाविद्यालयांतर्गत गुणवत्ता हमी कक्षाद्वारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने एक दिवशीय राज्यस्तरीय चर्चासत्र गेल्या शनिवारी (दि. १४) आयोजित करण्यात आले. 'उच्च शिक्षणामध्ये महिलांचा सहभाग : प्रवेश, समता आणि शैक्षणिक नेतृत्व' या विषयावरील चर्चासत्रासाठी बीजभाषक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ताराबाई शिंदे महिला अभ्यास केंद्राच्या संचालक डॉ. निर्मला जाधव उपस्थित होत्या.

आपल्या बीज भाषणातून त्यांनी स्त्रियांच्या मागासलेपणाच्या कारणांचा ऊहापोह केला. त्या म्हणाल्या की, स्त्रीमध्ये कार्य करण्याचे कौशल्य आदिकाळापासून आहेच, परंतु त्यांना संधी मिळत नव्हती. मुलीकडे 'परक्याचे धन' म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन त्यांच्या प्रगतीतील मोठा अडथळा होता. यामुळे स्त्रियांच्या उन्नतीकरिता १९७५ ते १९८५ हे महिला दशक म्हणून साजरे केले गेले. त्यानंतर भारतीय स्त्रियांच्या दर्जाचा अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन करून त्याच्या अहवालानुसार महिला बालकल्याण विभागातर्फे विविध योजना हाती घेतल्या गेल्या. मातृत्व आणि बालसंगोपन हे प्रामुख्याने स्त्रियांसाठी स्वतःच्या प्रगतीसाठी मोठे आव्हान ठरते. या दृष्टीने संस्था कार्यालयांनी डे-केअर सेंटरची सुविधा उपलब्ध केल्यास स्त्रियांसाठी ही एक मोठी संधी ठरेल यात शंका नाही.

द्वितीय सत्रात तज्ज्ञ साधन व्यक्ती म्हणून अहिल्यानगर येथील आयएमएससीडीआरच्या व्यवस्थापन



विभागाच्या प्रमुख डॉ. प्रणोती तेलोरे उपस्थित होत्या. आपल्या भाषणात त्यांनी स्त्रीच्या आत्मनिर्भरतेवर भर दिला. प्रत्येक स्त्रीने स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे असे सांगतानाच त्यांनी पुरुषांच्याही पाकसिद्धतेवर भाष्य केले. त्या म्हणाल्या की, पुरुषांनी सुद्धा किमान स्वतःचे पोट भरण्यासाठी स्वयंपाक करायला शिकले पाहिजे. समाजाच्या आजच्या या नव्या वळणावर स्त्रिया संरक्षण सेवेतसुद्धा काम करीत आहेत. समाज बदलत आहे. स्त्रियांना आणि पुरुषांनाही समान संधी मिळाव्यात. स्त्री-पुरुष समानतेची सुरुवात घरातूनच झाली पाहिजे. बालपणीच हे संस्कार मुलांवर केले पाहिजेत.

चर्चासत्राचे उद्घाटन हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. रमेश झरकर, उद्घाटक व बीजभाषक डॉ. निर्मला जाधव, तज्ज्ञ साधन व्यक्ती डॉ. प्रणोती तेलोरे आणि महाविद्यालयाचे पदाधिकारी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाले. यानंतर विद्यापीठ गीत म्हणण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांनी केले. याप्रसंगी बोलताना त्यांनी या विषयाचे महत्त्व विषद केले. देशाच्या प्रगतीसाठी स्त्रियांचे शिक्षण अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. तेराव्या शतकात होऊन गेलेल्या संत कवयित्री जनाबाईच्या- 'स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावे उदास' या अभंगाचा दाखला देत स्त्री शक्तीचे सामर्थ्य दर्शवले. प्रतिकूल परिस्थितीतही स्त्रियांनी निराश न होता प्रयत्नवादी रहावे असे त्या म्हणाल्या. जनाबाईचा हा उद्गार स्वतःचा आत्मोद्धार जसा आहे, तसाच स्त्रीमुक्ती आणि मानव मुक्तीचा उद्गार आहे.

अध्यक्षपदावरून बोलताना हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. रमेश झरकर यांनी चर्चासत्रासाठी निवडलेल्या विषयाचे महत्त्व स्पष्ट करून या विषयाच्या निवडीसाठी महाविद्यालयाच्या दूरदृष्टीचे कौतुक केले. प्रत्येक वर्षीच्या दहावी बारावीच्या निकालामध्ये मुलींच्या वाढत्या टक्केवारीचे त्यांनी कौतुक केले. माजी पंतप्रधान इंदिरा गांधींच्या कुशल नेतृत्वातून स्त्रीचे सामर्थ्य त्यांनी उद्धृत केले. वक्त्यांचा परिचय प्रा. डॉ. माधुरी दीक्षित आणि डॉ. प्रिया सारडा यांनी करून दिला. बीजभाषक डॉ. निर्मला जाधव यांचा गौरव डॉ. रमेश झरकर यांच्या हस्ते तर तज्ज्ञ साधन व्यक्ती डॉ. प्रणोती तेलोरे यांचा गौरव प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांच्या हस्ते करण्यात आला. पुष्पगुच्छ, विशेषांक, दैनंदिनी व पेन असे याचे स्वरूप होते.

उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन डॉ. दया जेठे यांनी केले.

## ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्काराने बेबीताई गायकवाड यांचा सन्मान; सामाजिक कार्याचा गौरव



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत देण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार' अहिल्यानगर येथील सामाजिक कार्यकर्त्या बेबीताई गायकवाड यांना मुंबई येथे आयोजित भव्य समारंभात प्रदान करण्यात आला. त्यांच्या एकल महिला, वीरपत्नी आणि वंचित घटकांसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याचा यावेळी शासनाच्या वतीने गौरव करण्यात आला.

या पुरस्कार वितरण सोहळ्यास उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अप्पर मुख्य सचिव वेणू गोपाल रेड्डी, संचालक डॉ. शैलेश देवळाणकर, कुलगुरू प्रा. डॉ. उज्वला चक्रदेव, कुलसचिव डॉ. विलास नांदेडकर, सहसंचालक डॉ. अर्चना बोऱ्हाडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आपल्या भाषणात राज्यातील मुलींच्या शिक्षणासाठी शासनाने घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांची माहिती दिली. अभियांत्रिकी, वैद्यकीय, कृषी व व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी मागील दोन वर्षांपासून शिक्षण शुल्क पूर्णपणे माफ करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. यापूर्वी आठ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्या कुटुंबातील मुलींना ५० टक्के शुल्क माफी देण्यात येत होती, मात्र आता ही सवलत १०० टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आल्याने मोठ्या प्रमाणात मुली शिक्षणाकडे वळत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच विद्यार्थिनींसाठी निर्वाह भत्ता योजना सुरू करून त्यांच्या राहणीमानाचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न होत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिराव फुले यांच्या कार्याचा गौरव करत महिलांच्या शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. ''पुरस्कार हा थांबण्याचा टप्पा नसून अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा आहे,'' असे सांगत त्यांनी बेबीताई गायकवाड यांच्या कार्याचा विशेष उल्लेख केला आणि त्यांच्या कार्याचा आदर्श युवा पिढीने घ्यावा असे आवाहन केले.

या समारंभात पुरस्कारार्थींना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र तसेच रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

यावेळी बोलताना सामाजिक कार्यकर्त्या बेबीताई गायकवाड म्हणाल्या की, ''ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले हा पुरस्कार माझा नसून गेली तेरा वर्षे मी वीरपत्नी व एकल महिलांसाठी केलेल्या कार्याचा आहे. सावित्रीबाई फुले यांच्या नावाने मिळालेला हा सन्मान माझी जबाबदारी अधिक वाढवणारा आहे. त्यांच्या विचारांना साजेसं कार्य पुढेही करत राहीन.

## श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघातर्फे नगरसेवकांचा गौरव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने प्रभाग क्रमांक ७ मधील नगरसेवकांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिकांच्या उपस्थितीत नगरसेवकांना सन्मानित करत विकासाच्या नव्या संकल्पाला बळ देण्यात आले.

यावेळी माजी महापौर बाबासाहेब वाकळे म्हणाले की, ज्येष्ठ नागरिक हे समाजातील अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. त्यांच्या आयुष्यातील अनुभव हे आजच्या युवा पिढीसाठी ऊर्जा व प्रेरणा देणारे आहेत. ज्येष्ठ नागरिकांनी केलेला सन्मान ही आमच्यासाठी मोठी जबाबदारी असून त्यांनी दाखविलेला विश्वास विकासकामांद्वारे सार्थ करण्याचा आम्ही निर्धार करतो. त्यांच्या आशीर्वादामुळे पुढील कामासाठी प्रेरणा मिळते, असे त्यांनी नमूद केले.

या सोहळ्यात माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, माजी सभापती नगरसेविका पुष्पाताई बोरुडे, वंदनाताई ताठे, नगरसेवक रवींद्र बारस्कर, रोहन सानप, विलास ताठे, रेवननाथ पवार यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष भीमाशंकर लांडे, कार्याध्यक्ष संभाजी काळे, सचिव अंबादास बेंद्रे, गणपतराव हिंगे, विश्वनाथ



जाधव, आबा कोकाटे, रमेश मुसळे, दत्तात्रय भगत, हरिभाऊ टकले, रघुनाथ कोतकर, मनीराम सावरकर, रत्नमाला लांडे, चंपावती जगताप, राजेंद्र मोरे, दिनकर देशमुख, सुनंदा सत्रे आदींसह ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष भीमाशंकर लांडे म्हणाले की, प्रभागातील नगरसेवकांनी यापूर्वी केलेल्या विकासकामांमुळेच जनतेने त्यांना पुन्हा निवडून दिले आहे. सर्वांना सोबत घेऊन काम करणाऱ्या लोकप्रतिनिधींचा गौरव करण्यासाठी हा सत्कार आयोजित करण्यात आला. ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्नही या नगरसेवकांनी वेळोवेळी सोडवले असून संघाला आरसीसी इमारत, बसण्यासाठी गार्डन तसेच दत्त मंदिरासाठी सभामंडप उभारणीसारखी कामे करण्यात आली आहेत. चांगले काम करणाऱ्यांच्या पाठीशी ज्येष्ठ नागरिक नेहमी ठामपणे उभे राहतात, असे त्यांनी सांगितले.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. ※संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

# आचार्यश्रींच्या पुण्यस्मृतीनिमित्त आनंदधाम येथे भगवान महावीर व्याख्यानमालेचे आयोजन



अहिल्यानगर- राष्ट्रसंत आचार्य सम्राट पूज्य आनंदऋषीजी महाराज यांच्या ३४ व्या पुण्यस्मृती निमित्त जैन सोशल फेडरेशनच्यावतीने आनंदधामच्या प्रांगणात प्रबुद्ध विचारक पूज्य आदर्शऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने भगवान महावीर व्याख्यानमाला २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. दि. २१ ते २७ मार्च २०२६ या कालावधीत दररोज सायंकाळी ७ वाजता व्याख्यानमाला होईल. व्याख्यानमालेचे मुख्य प्रायोजक विजयकुमारजी मुनोत यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ श्रीमती इमरतबाई मुनोत (नेवासावाला) परिवार आहे.राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या स्मृतीनिमित्त जैन सोशल फेडरेशन तर्फे दरवर्षी भगवान महावीर व्याख्यानमाला आयोजित करण्यात येते. विविध क्षेत्रातील दिग्गज मंडळी यात सहभागी होऊन विविध विषयावर विचार व्यक्त करत असतात. यंदाही अशीच प्रबोधनात्मक आणि वैचारिक मेजवानी नगरकरांना मिळणार आहे.शनिवार दि. २१ मार्च रोजी कोल्हापूर येथील प्रसिद्ध व्यक्ते प्रा. गणेश लोळगे यांचे आयुष्याला द्यावे उत्तर:या विषयावर व्याख्यान होईल. रविवार दि. २२ मार्च रोजी अकोला येथील फडके ॲकॅडमीचे संचालक सतीश फडके यांचे तुमचे आमचे आध्यात्म या विषयावर व्याख्यान होईल. सोमवार दि. २३ मार्च रोजी निवेदिका तथा समुपदेशक क्षिप्रा मानकर यांचे समाज परिवर्तनात महिलांची भूमिका या विषयावर व्याख्यान होईल. मंगळवार दि. २४ मार्च रोजी लेखक तथा प्रेरणादायी वक्ते युवराज पाटील यांचे अस्वस्थ वर्तमान आणि आपली भूमिका या विषयावर व्याख्यान होईल. बुधवार दि. २५ मार्च रोजी पुणे येथील प्रसिद्ध शिक्षण तज्ज्ञ केदार वाळिंबे यांचे फिअर ऑफ मिसिंग आऊटच्या पलिकडचे पालकत्व या विषयावर व्याख्यान होईल. गुरूवार दि. २६ मार्च रोजी प्रसिद्ध वक्ते वैभव ढूस यांचे आत्मविश्वासाने प्रगती या विषयावर व्याख्यान होईल. शुक्रवार दि. २७ मार्च रोजी व्याख्यानमालेची सांगता प्रसिद्ध वक्ते, युवा मार्गदर्शक ओंकार दाभाडकर यांच्या यशातील अडसर: आपला मेंदू या विषयावरील व्याख्यानाने होईल. आनंदधाम येथे आयोजित या व्याख्यानामालेला जास्तीत जास्त भाविकांनी उपस्थित राहावे असे आवाहन जैन सोशल फेडरेशनने केले आहे.

# विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव



अहिल्यानगर - समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांच्या गौरवासाठी कै. श्रीमती इचरजाबाई हस्तीमलजी मुनोत महिला गौरव पुरस्कार २०२६ वितरण सोहळ्याचे आयोजन दि. २५ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता केशरगुलाब मंगल कार्यालय, अहिल्यानगर येथे संपन्न होणार आहे. समर्पण, सेवा आणि समाजहिताचा आदर्श देणाऱ्या कै. श्रीमती इचरजाबाई हस्तीमलजी मुनोत यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हा पुरस्कार२०२५ पासून सुरू करण्यात आला आहे समाजाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करण्याचा हा उपक्रम आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहिल्यानगरचे कलेक्टर आदरणीय श्री पंकज जी एशिया व प्रमुख पाहुणे म्हणून अहमदनगर कॅन्टोन्मेंट च्या सीईओ आदरणीय पल्लवी विजयवंशी हे मान्यवर उपस्थित राहणार आहेतयावर्षी हा सन्मान पुढील मान्यवर महिलांना प्रदान करण्यात येणार आहे : सौ. उषा देशमुख औद्योगिक क्षेत्रातील व शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी सौ. रुपाली मुनोत समाजसेवा क्षेत्रातील कार्यासाठी (स्नेहालय व दत्तक केंद्र कार्य) सौ. मीना मुनोत सहकार व पत्रकारिता क्षेत्रातील कार्यासाठी डॉ. श्रीमती मार्शिया वॉरेन वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रातील योगदानासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने करण्यात येणार आहे यामध्ये समाजातील विविध मान्यवर, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या प्रेरणादायी कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे विश्वस्त संचालक श्री किशोर मुनोत व महाविद्यालयाच्या परिसर संचालिका डॉक्टर स्वाती मुनोत यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# सिद्धी प्रमोद गांधी स्टुडन्ट ऑफ द इयर ने सन्मानित



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** येथील बीपीएचई सोसायटीचे आय एम एस या व्यवस्थापन संस्थेतील एम बी ए द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी सिद्धी प्रमोद गांधी हिला संस्थेचे संचालक डॉ. एम.बी. मेहता यांच्या हस्ते स्टुडन्ट ऑफ द इयरने सन्मानित करण्यात आले. उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. प्रोनोती तेलोरे, संगणक विभाग प्रमुख डॉ. महेश पोतदार आदी उपस्थित होते.

एम बी ए च्या प्रथम वर्षाला प्रवेश घेतल्यापासून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गोष्टींचे निरीक्षण केले जाते. त्यात त्याची वर्तणूक, शिक्षकांसोबत असणारा संवाद, समूहाने दिलेल्या अनेक उपक्रमामध्ये असलेला सहभाग, शैक्षणिक गुणवत्ता, दोन वर्षात इतर उपक्रम जसे की शोध निबंध, विदयापीठाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या अनेक स्पर्धांमधील सहभाग अशा अनेक पातळ्यांवर विद्यार्थ्यांची तपासणी केली जाते. अभ्यासक्रम शिकवणारे सर्व शिक्षकांच्या सहमतीने विद्यार्थ्यांची निवड केली जाते.

सर्व पातळ्यांवर उत्तम कामगिरी केल्यामुळेच गांधी हिची स्टुडन्ट ऑफ द इयर म्हणून निवड करण्यात आली. या सन्मानामुळे इतर विद्यार्थ्यांना देखील वर्षभर चांगली कामगिरी करण्याची प्रेरणा मिळते.

यावेळी सिद्धी गांधी हिने मनोगत व्यक्त करताना सांगितले की, आय एमं एस सारख्या प्रतिष्ठित संस्थेत मॅनेजमेंटचे शिक्षण घेण्याची संधी मला मिळाली. पहिल्या वर्षापासून येथील शिक्षकांची तळमळ, विषय समजून सांगण्याची हातोटी खूप भावली. विविध उपक्रमांत सहभागी होताना नवनवीन गोष्टी शिकायला मिळाल्या. सर्व शिक्षकांनी वेळोवेळी पाठबळ देत प्रोत्साहन दिले. त्याचा स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवताना खूप काही फायदा झाला. भविष्यात येथे मिळालेली संस्कारांची शिदोरी जीवनात कायम उपयोगी पडेल असा विश्वास व्यक्त करत सिद्धी गांधी हिने सर्व शिक्षकांचे, स्टाफचे आभार मानले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल आरोग्यसेवेतून माणुसकी धर्म जपत आहे – डॉ. प्रतिक कटारिया

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून आरोग्यसेवेतून माणुसकी धर्म जपला जात आहे. येणाऱ्या रुग्णांकडे माणुसकीच्या भावनेने पाहून त्याच्या जीवनातील वेदना दूर करण्याचे काम हे आरोग्य मंदिर करत आहे. देवाच्या कृपेने या आरोग्य सेवेच्या कार्यात कटारिया परिवाराची दुसरी पिढी देखील डॉक्टरच्या रुपाने जोडली गेली आहे. या सेवा कार्यात योगदान देत असल्याचा संपूर्ण परिवाराला अभिमान असल्याचे डॉ. प्रतिक कटारिया यांनी सांगितले.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या ३४ व्या स्मृतिदिनानिमित्त श्रीमती रिमलबाई शांतीलाल कटारिया यांच्या स्मरणार्थ डॉ. वसंत कटारिया परिवाराच्या वतीने आयोजित



श्वसन विकार मोफत तपासणी शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी डॉ. प्रतिक कटारिया बोलत होते. यावेळी डॉ. वसंत कटारिया, डॉ. अनिकेत कटारिया, लता कटारिया, प्रज्ञा कटारिया, हर्षदा कटारिया, मनीष लोढा, संतोष बोथरा, सतीश लोढा, डॉ. प्रकाश कांकरिया, मानकचंद कटारिया, प्रकाश छल्लाणी, सुभाष मुनोत, श्वसन विकार तज्ञ डॉ. स्नेहा तिरपुडे व डॉ. प्रणाली त्रिमुखे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले की, आनंदऋषी हॉस्पिटलमध्ये डॉ. वसंत कटारिया यांच्या मार्गदर्शनाखाली कार्डियाक सेंटर सुरू करण्यात आले. त्यांनी आपल्या तिसऱ्या अपत्याप्रमाणे त्याचा सांभाळ करून त्याला मोठे केले. आज त्यांनी २५ हजार पेक्षा जास्त बायपास सर्जरी यशस्वीरित्या केले. पूर्वी हृद्याच्या शस्त्रक्रियेसाठी मोठ्या शहरात जावे लागायचे. सेटअप नसताना सेवाभावाने हा प्रकल्प उभारण्यात आला, आज महाराष्ट्रातील एक अद्यावत सेंटर बनला असून, अनेक शहरातील रुग्ण याचा लाभ घेत आहे. कटारिया यांची दोन्ही मुले डॉक्टर असून, ते देखील या सेवा कार्यात जोडली गेली आहे. दोन्ही आपल्या क्षेत्रात निपुण आहे.



केडगाव येथे शाही जामा मस्जिद मध्ये रमजान ईद उत्साहात संपन्न ईदची नमाज पठण करताना मुस्लिम बांधव.
(छाया – समीर मन्यार)

# ऋचा इंजिनियर्स प्रायव्हेट लिमिटेडचा जापानमध्ये जागतिक सन्मान

## व्हाइस प्रेसिडेंट नगरचे सुपुत्र रविकुमार मंगलारप यांचाही गौरव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** छत्रपती संभाजीनगर येथील औद्योगिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या ऋचा इंजिनियर्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने आंतरराष्ट्रीय स्तरावर मानाचा समजला जाणारा टी पी एम एक्सेलँस अवॉर्ड २०२५ (२०२५ ) प्राप्त करत उल्लेखनीय कामगिरीची नोंद केली आहे. जपानमधील जापान इन्स्टिट्यूट ऑफ प्लॅन्ट मेंटेनन्स () या संस्थेतर्फे देण्यात येणारा हा प्रतिष्ठेचा पुरस्कार क्योटो येथील क्योटो इंटरनॅशनल कॉन्फरन्स सेंटर मध्ये पार पडलेल्या भव्य समारंभात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

या सन्मानाच्या वेळी कंपनीचे व्हाइस प्रेसिडेंट रविकुमार चंद्रकांत मंगलारप तसेच कार्यकारी संचालक उमेश दाशरथी साहेब, संचालक ज्योती दाशरथी यांनी संयुक्तपणे पुरस्कार स्वीकारला. विशेष म्हणजे, ऋचा इंजिनियर्स प्रायव्हेट लिमिटेडचे व्हाइस प्रेसिडेंट रविकुमार मंगलारप हे मूळचे अहिल्यानगरचे सुपुत्र असून त्यांच्या



या यशामुळे नगरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

टोटल प्रॉडक्टिव्ह मेंटेनन्स या व्यवस्थापन प्रणालीच्या आठ स्तंभांवर आधारित कठोर आंतरराष्ट्रीय मूल्यमापनातून हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. गुणवत्ता, कार्यक्षमता आणि सतत सुधारणा या क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कंपन्यांना हा सन्मान दिला जातो. ऋचा इंजिनियर्स प्रायव्हेट लिमिटेडने या सर्व निकषांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत हा मान मिळवला आहे.

उमेश दाशरथी यांच्या नेतृत्वाखाली कंपनीने सातत्यपूर्ण प्रगती साधली असून, ज्योती दाशरथी व संचालक रोहित दाशरथी साहेब यांच्या मोलाच्या मार्गदर्शनामुळे कंपनीने औद्योगिक क्षेत्रात नवे मानदंड प्रस्थापित केले आहेत. कंपनीतील सर्व कामगार आणि कर्मचाऱ्यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळेच कंपनीला हा जागतिक सन्मान मिळाल्याचे मानले जात आहे.

या यशामुळे छत्रपती संभाजीनगरच्या औद्योगिक क्षेत्रासह अहिल्यानगर जिल्ह्याचा अभिमान उंचावला असून, विविध स्तरांतून सर्वांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव सर्वत्र होत आहे.

# नेप्तीत नवनाथ संगीत ज्ञानयज्ञ कथेला प्रारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील नेप्ती येथे श्रीराम नवमी निमित्त श्रीराम सेवा मंडळ व ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीराम मंदिरासमोर श्रीराम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त नवनाथ संगीत कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. या कथेला भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे .यंदा या सोहळ्याचे ३७ वे वर्ष असून श्रीराम विजयग्रंथ व ज्ञानेश्वरी पारायणासह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.

या सोहळ्याचा शुभारंभ गुरुवर्य औघड पीर मलंगनाथजी महाराज व गुरुवर्य मस्तनाथजी महाराज यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आला. यावेळी प्रतिमा पूजन व ग्रंथ पूजन करून कथेला भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला.

या नवनाथ कथा ज्ञानयज्ञासाठी कृष्ण कृपांकित ह.भ.प. डॉ. विकासानंदजी महाराज मिसाळ (संत पंढरी) यांच्या आशीर्वादाने त्यांचे शिष्य ह.भ.प. प्रेमानंदजी महाराज आंबेकर शास्त्री टाकळी ढोकेश्वर हे कथा प्रवक्ते आहेत. कथेची वेळ दररोज रात्री ८ ते ११ अशी ठेवण्यात आली असून, २० मार्च ते २७



मार्च पर्यंत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कथेला गायक ह.भ.प. रोहिदास जाधव महाराज (राहुरी), सिंथे सायजर अमोल पानमंद महाराज (खरवंडी), तबला वादक ह.भ.प. सोमनाथ महाराज यशवंते तसेच बासरी वादक बाबासाहेब भोर सर यांची सुरेल साथ लाभत आहे. दररोज सायंकाळी ६ वाजता नेप्ती भजनी मंडळाच्या वतीने हरिपाठाचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी श्रीराम सेवा मंडळाचे अध्यक्ष बबन फुले, उपाध्यक्ष बाळासाहेब होळकर, माजी सरपंच दिलीप होळकर, माजी उपसरपंच जालिंदर शिंदे ,सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले, श्रीनिवास महाराज जपकर, बाळासाहेब बेल्हेकर, बबन बेल्हेकर, चंद्रकांत खरमाळे, एकनाथ होळकर, बबन शिंदे, राहुल कांडेकर, पितांबर जवणे, प्रभाकर चहाळ, अशोक गवळी ,विलास जपकर, शिवाजी गाडेकर, दादू दरेकर , मारुती कावरे, अमोल चौगुले, बाबासाहेब जाधव, विष्णू गुंजाळ, योगेश कुलकर्णी, बंडू रावळे, भानुदास फुले, राजू फुले, राजाराम जपकर, पोपट मोरे, पाराजी होळकर, रावसाहेब इंगोले, सुरेश चत्तर, गुलाब होळकर, दादाभाऊ फुले, रावसाहेब पुंड, बाबासाहेब रावळे, दादू थोरात, दत्तू थोरात, शंकर इंगोले आदींसह श्रीराम सेवा मंडळाचे सर्व सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोहळ्यानिमित्त २६ मार्च रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत राम जन्माचे कीर्तन होणार असून, २७ मार्च रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत काल्याचे कीर्तन होईल. काल्याचे अन्नदाते रावसाहेब भागीनाथ होळकर हे आहेत . ज्ञानेश्वरी पारायणात महिला व पुरुष भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभत आहे. या सोहळ्यामुळे संपूर्ण नेप्ती गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून मंदिर परिसराची स्वच्छता करून आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

# नेवासे एमआयडीसीमध्ये पोलिस चौकीचा प्रस्ताव देऊ – जिल्हाधिकारी डॉ. आशिया



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नेवासे औद्योगिक क्षेत्रासाठी स्वतंत्र पोलिस चौकी करण्याबाबतचा प्रस्ताव संबंधित वरिष्ठ पोलिस अधिकार्यांकडे पाठवण्याची ग्वाही जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी येथे दिली. येथील औद्योगिक क्षेत्राचा सुरळीत पाणीपुरवठा व येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्याबाबतही संबंधितांना सूचना देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी नुकतीच नेवासा एमआयडीसी येथील गॅलेक्सी लॅबोरेटरीज प्रायव्हेट लिमिटेड या उद्योगास भेट दिली व या उद्योगाच्या कामकाजाची माहिती जाणून घेतली. या उद्योगाचे व्यवस्थापकीय संचालक श्रीकांत देशमुख यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी डॉ. आशिया यांनी नेवासे औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांशीही संवाद साधला व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. या बैठकीस गॅलेक्सी लॅबोरेटरीजचे व्यवस्थापकीय संचालक श्रीकांत देशमुख व संचालक पियूष कोटेचा यांच्यासह व्हीआरएस फूड आणि पॉवर लाईट या उद्योगांचे प्रतिनिधी तसेच नेवाशाचे तहसीलदार संजय बिरादार, एमआयडीसीचे क्षेत्र व्यवस्थापक दिलीप काकडे, सहाय्यक क्षेत्र व्यवस्थापक बंडू दामले, पाणीपुरवठा व्यवस्थापक एकनाथ कराळे, सिव्हिल विभागाचे अशोक माचे व दादासाहेब तुपे उपस्थित होते.

औद्योगिक युनिट्सच्या प्रतिनिधींशी झालेल्या या बैठकीत नेवासे औद्योगिक क्षेत्रातील विविध समस्या मांडण्यात आल्या. प्रामुख्याने पाणीपुरवठ्याशी संबंधित अडचणी, जसे की पाण्याची कमतरता, गळती, टँकरवरील अवलंबित्व तसेच दाब व्यवस्थापन याबाबत चर्चा करण्यात आली. पाणी मुळा धरणातून घेतले जात असल्याची माहिती देण्यात आली व यासंदर्भातील सुधारणा कामे सुरू असल्याचे सांगण्यात आले. याशिवाय पायाभूत सुविधांशी संबंधित मुद्देही उपस्थित करण्यात आले. विशेषतः सेवा रस्त्याची खराब अवस्था, खड्डे आणि त्यामुळे जड वाहनांच्या वाहतुकीस होणारा त्रास याकडे लक्ष वेधण्यात आले. याबाबत पूर्वी एमआयडीसी असोसिएशनकडे निवेदन देण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले. सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने स्ट्रीट लाईट्सची गरज आणि नियमित पोलिस गस्त वाढविण्याची आवश्यकता यावरही चर्चा झाली. उशिराच्या वेळेस काम करणार्या कर्मचार्यांना सुरक्षिततेबाबत अडचणी येत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. तसेच, आपत्कालीन परिस्थितीत जवळपास आरोग्य सुविधा उपलब्ध नसल्यामुळे तातडीने वैद्यकीय मदत मिळण्यात अडचणी येतात. यामुळे औद्योगिक क्षेत्रात आरोग्य केंद्राची गरज मांडण्यात आली.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी सर्व मुद्यांची नोंद घेऊन तात्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले. पाणीपुरवठ्याच्या समस्येवर तत्काळ उपाययोजना करण्यात येतील तसेच पुढील काही दिवसापासून पोलिस गस्त सुरू करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

# डॉक्टर दांपत्याचा ५७ लोकांत साध्या पद्धतीने विवाह संपन्न

## मराठा सोयरिक संस्थेचे मार्गदर्शन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बीड येथिल वर पिता ब्यंकट स्वामी महावीद्यालयतील अर्थशास्त्र विभागाचे सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. श्री. मदन राधाकिसन शिंदे ता. गेवराई. जी. बीड यांचे सुपुत्र ची. एम. डी. डॉ. अक्षय शिंदे व वधु पिता पोलीस निरीक्षक ज्ञानदेव बाबासाहेब दहातोंडे, महामार्ग पोलीस बीड, व वधु माता संगीता दहातोंडे (सहायक अधीक्षक न्यायालय आष्टी) रा. सालेवडगाव यांची कन्या चि. सौ. कां. एमबीबीएस डॉक्टर कोमल यांचा विवाह शिवधर्माचे अनुकरण करून साध्या पद्धतीने ५७ लोकांच्या उपस्थितीत नुकताच नगर शहरात आम्रपाली गार्डन येथे पार पडला.

मराठा सेवा संघाचे व मराठा सोयरीक संस्थेचे नेवासा येथील ज्येष्ठ मार्गदर्शक श्री चंद्रकांत काळे व जगदंब फाउंडेशनचे सचिव अशोक कुटे यांच्या मार्गदर्शनाखाली हा विवाह घडून आला. हा विवाह संपन्न करण्यासाठी महाराष्ट्राचे शिवधर्म प्रचारक संभाजीनगर येथील ज्ञानेश्वर गुरुजी यांना निमंत्रित करण्यात आले होते. या विवाहाचे वैशिष्ट्य म्हणजे दोन्ही कुटुंब उच्चशिक्षित व सधन असताना एक रुपयाही हुंडा न घेता एक रुपयाही भेटवस्तू न घेता, सीडीचा गोंगाट न ठेवता केवळ मोजक्या लोकांच्या उपस्थितीत सनई वाद्याच्या सुरात वधू-वरांचा विवाह संपन्न झाला. तसेच जिजाऊ माँसाहेब, छत्रपती शिवाजी महाराज व जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून वधू-वरां मध्ये अंतरपाट न धरता मंचावर वधू माता पिता -वर माता पिता व मामा व मामी यांच्या उपस्थितीत शिवधर्म पद्धतीने जिजाऊ वंदना व मंगलाष्टक झाल्यावर वधू -वर यांनी एकमेकांना स्विकारण्याची शपथ घेऊन प्रथम वराने वधूच्या गळ्यात व नंतर वधू ने वराच्या गळ्यात एकमेकांना हार घातले.

या लग्नामध्ये एकही आशीर्वाद नव्हते. एकही सत्कार केले नाही. वधू-वरांनी अशा पद्धतीने विवाह करून समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे. संभाजीनगर येथील श्री ज्ञानेश्वर गुरुजी यांनी शिव विवाह पद्धतीने मंगलाष्टके म्हटली आणि त्यानंतर अक्षदांऐवजी फुलांच्या पाकळ्यांचा वर्षाव करण्यात आला.

# उपनगरांचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय - आमदार संग्राम जगताप

## माजी नगरसेवक सचिन शिंदे यांच्या प्रयत्नातून कल्याण रोड भागातील केतन पार्क परिसरातील रस्त्याच्या कामाचा शुभारंभ आमदार निधीतून विकासाला गती




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** माजी नगरसेवक सचिन शिंदे यांच्या प्रयत्नातून कल्याण रोडवरील छत्रपती शिवाजीनगर परिसरातील केतन पार्क येथे आमदार निधीतून होणाऱ्या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ आमदार संग्राम भैय्या जगताप यांच्या हस्ते उत्साहात करण्यात आला. या कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांसह अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी नगरसेवक संजय शेंडगे, शाम नळकांडे ,सचिन शिंदे, महेश लोंढे, बाबासाहेब मुदगल, अमर मुदगल, हरिभाऊ शिंदे, देविदास मुदगल, शंकर बीमन, किशोर गाडेकर, बाळासाहेब साठे, महेश मोरे, एल.बी. म्हस्के , राजू लोटके, युवराज गुंजाळ, राजू मुदगल, सुशांत शिंदे, भैय्या गडाख, उमेश कटारिया, युवराज नळकांडे, प्रल्हाद कदम, अशोक मोरे, राजकुमार ठुबे, जयप्रकाश डी. वानी, सतीश गीते, प्रवीण ठोंबरे, बापू लोटके, कृष्णा शिंदे, अविनाश दिवटे, सोनू चौधरी, राहुल संगम, बाळू फंड, सार्थक मोरे, शुभम सातपुते, युवराज जंगम, दत्तात्रय लोटके आदींसह महिला वर्गही मोठ्या संख्येने उपस्थित होता.

कार्यक्रमात बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, उपनगरांचा झपाट्याने विस्तार होत असून त्या भागांचा नियोजनबद्ध विकास करणे ही आमची प्राथमिकता आहे. शासनाच्या विविध योजनांमधून निधी उपलब्ध करून देत या भागातील पायाभूत सुविधा मजबूत करण्याचे काम सुरू आहे. नागरिकांना उत्तम दर्जाचे रस्ते, पाणी, वीज व इतर सुविधा देण्याचा आमचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे.

पुढे ते म्हणाले की, केतन पार्क परिसरातील हा रस्ता नागरिकांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे. तसेच कल्याण रोड परिसरातील सेना नदीवरील पुलाचे कामही अंतिम टप्प्यात असून ते लवकरच पूर्ण होईल. यामुळे वाहतूक सुलभ होऊन या भागाच्या विकासाला मोठी चालना मिळणार आहे. नागरिकांच्या सर्वांगीण सोयीसाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

यावेळी माजी नगरसेवक सचिन शिंदे यांनी सांगितले की, परिसरातील प्रत्येक गल्लीबोळात विकासकामे व्हावीत यासाठी आम्ही सातत्याने आमदार संग्राम भैय्या जगताप यांच्याकडे पाठपुरावा करत आहोत. त्यांच्या सहकार्यामुळेच या भागात मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होत असून विकासकामांना गती मिळत आहे. नागरिकांना सर्व सुविधा मिळाव्यात यासाठी आमचे प्रयत्न अखंड सुरू राहतील.

कार्यक्रमाचे वातावरण उत्साहपूर्ण होते आणि नागरिकांनी या विकासकामाचे स्वागत केले.

---

# अहिल्यानगर मनपा अंदाजपत्रकात नगरसेवक निखिल वारे यांचा विकासासोबत समाजघटकांनाही न्याय द्या!

## पुतळा, नशामुक्ती केंद्र, महिलांसाठी वस्तीगृह, वृद्धाश्रम व ई-लायब्ररीसाठी निधीची जोरदार मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महानगरपालिकेच्या सन २०२६-२७ च्या तब्बल १७१० कोटी रुपयांच्या भव्य अंदाजपत्रकात केवळ पायाभूत सुविधांपुरता विकास मर्यादित न ठेवता सामाजिक परिवर्तन घडविणाऱ्या उपक्रमांसाठी ठोस निधीची तरतूद करावी, अशी ठाम व आग्रही मागणी नगरसेवक निखिल वारे यांनी स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शहराच्या सर्वांगीण विकासासोबतच दुर्लक्षित घटकांना आधार देणाऱ्या योजना राबविणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. या निवेदनातून केवळ मागण्या नव्हे, तर सामाजिक जबाबदारीची जाणीव अधोरेखित झाल्याचे चित्र दिसून येते.

पत्रकार चौक येथे सध्या कार्यरत असलेले वाहतूक शाखेचे तात्पुरते कार्यालय स्थलांतरित करून त्या ठिकाणी अहिल्यादेवी होळकर यांचा भव्य पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. नाशिकच्या धर्तीवर उभारण्यात येणारा हा पुतळा शहराच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैभवाला अधोरेखित करेल. यासोबतच ''अहिल्यादेवी सांस्कृतिक महोत्सव'' आयोजित करण्यासाठीही निधीची तरतूद करण्याची मागणी करण्यात आली आहे.

आजच्या काळात तरुणांमध्ये वाढती व्यसनाधिनता ही गंभीर समस्या बनली आहे.



या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या पिंपळगाव माळवी येथील जागेत अत्याधुनिक नशामुक्ती केंद्र उभारण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. या केंद्रामुळे व्यसनाच्या विळख्यात अडकलेल्या तरुणांना नवे जीवन मिळू शकते, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

अहिल्यानगर जिल्ह्यातील सुमारे ११ हजार एकल महिलांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधत त्यांच्या निवासासाठी सुरक्षित व सुसज्ज वस्तीगृह उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच त्यांच्या मुलांसाठी संस्कारक्षम वातावरण देणारे बालसंस्कार केंद्र उभारणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे नमूद करण्यात आले.

बदलत्या कौटुंबिक परिस्थितीत अनेक ज्येष्ठ नागरिक निराधार होत असल्याचे वास्तव लक्षात घेऊन शहरात सुसज्ज वृद्धाश्रम उभारण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे. ज्येष्ठांना सुरक्षित, सन्माननीय व आधारयुक्त जीवन मिळावे, हा या प्रस्तावामागील उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या युवकांसाठी आधुनिक सुविधा असलेली ई-लायब्ररी उभारण्याची मागणीही करण्यात आली आहे. डिजिटल युगात विद्यार्थ्यांना दर्जेदार अभ्याससाहित्य व शांत वातावरण उपलब्ध व्हावे, यासाठी ही योजना अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

नगरसेवक निखिल वारे यांनी आपल्या निवेदनातून स्पष्ट केले की, शहराचा विकास हा केवळ रस्ते, पाणीपुरवठा किंवा इमारतीपुरता मर्यादित नसून समाजातील प्रत्येक घटकाला सक्षम बनवणे हेही तितकेच आवश्यक आहे. महिलांपासून युवकांपर्यंत आणि ज्येष्ठांपासून विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांना आधार देणाऱ्या या योजना शहराला नवी दिशा देतील.

---

# माजी सरपंच कासुळे यांच्या वतीने जि.प शाळा भालगाव संघनक भेट

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**खरवंडी कासार–** जिल्हा परिषद शाळा भालगाव येथे अंकुशराव कासुळे माजी सरपंच भालगाव यांच्या माध्यमातून दोन संगणक संच भेट देण्यात आले यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थाणी ह भ प नवनाथ महाराज शास्त्री हे होते प्रमुख उपस्थिती याप्रसंगी भालगाव सरपंच पोपट रोकडे, चेअरमन रावसाहेब खेडकर अशोक खेडकर सुदाम तात्या खेडकर जयहिंद जायभाये भीमराव कासुळे अण्णासाहेब ढाकणे विठ्ठल खेडकर दिनकर खेडकर बाळासाहेब बनसोडे परमेश्वर सुपेकर सचिन बेद्रे ज्ञानेश्वर सुपेकर जग्गनाथ सुपेकर प्रकाश साबळे अंबादास खेडकर( ग्रा. सदस्य) मुख्याध्यापक सौ. वडते शिक्षक आरेकर केदार मेंढके शालेय शिक्षण समिती अध्यक्ष हिम्मत खेडकर, उपाध्यक्ष कल्याण नारायण सुपेकर आदी ग्रामस्थ व पालक यांची उपस्थिती होती

---

# नवजीवनच्या वतीने जिल्हाभर बालविवाह मुक्त भारत अभियानाद्वारे जनजागृती

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारत सरकारच्या महिला व बाल विकास मंत्रालय यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या बालविवाहमुक्त भारत अभियानची जनजागृती मोहीम अहिल्यानगर महिला व बालविकास कार्यालय यांच्या मार्गदर्शनाखाली नवजीवन ग्रामोदय प्रतिष्ठानच्या वतीने नगर जिल्ह्यामध्ये उस्फूर्तपणे राबविण्यात आली.

बालविवाह ही समाजाला लागलेली घातक कीड आहे ती मुळापासून नष्ट करण्यासाठी आणि प्रभावी जनजागृती घडवून आणण्यासाठी नवजीवन ग्रामोदय प्रतिष्ठानच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्यात २३ हजार ५०० हून अधिक प्रतिज्ञापत्र / शपथपत्र जिल्हा परिषद शाळा, हायस्कूल, कॉलेज, चर्च, मंदिर, बचतगट, ग्रामपंचायत, स्वयंसेवी संस्था, कार्यालये, रात्रशाळा, धार्मिक कार्यक्रम अशा ठिकाणी सामूहिक शपथविधी घेण्यात आले. त्यामध्ये विद्यार्थी, पालक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



बालविवाहमुक्त भारत अभियान यशस्वीरित्या राबविण्यासाठी नवजीवनच्या संगीता पवार, सुदीप पडवळ, दिपक बत्तीशे यांच्या मार्गदर्शनाखाली ईश्वरी पवार, विश्वास जावळे, ऋषिकेश राऊत, सुरज मिसाळ, रोहन सोनवणे, अमोल गावडे, सोनल डोळझाके, सतीश चितलकर, प्रतीक्षा गायकवाड, अभिषेक मिसाळ, विक्रम हारदे, शीतल डगळे आदींनी परिश्रम घेतले.

लहान मुलींच्या लग्नाच्या चर्चा सुरू होताच त्या संबंधित कुटुंबांशी संवाद साधून समुपदेशन केले जाईल. बालविवाहाचे दुष्परिणाम समजावून सांगतील आणि कोणत्याही परिस्थितीत अशा घटना घडू देणार नाहीत. आपले गाव बालविवाहमुक्त करून संपूर्ण अहिल्यानगर जिल्हा बालविवाहमुक्त करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असा निर्धार नवजीवन ग्रामोदय प्रतिष्ठानच्या वतीने व्यक्त केला.

अल्पवयीन मुला मुलींचे विवाह रोखून त्यांना शिक्षण, आरोग्य व सुरक्षित भविष्याची हमी देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. बालविवाह ही सामाजिक समस्या असून ती मुलींच्या शिक्षणात अडथळा निर्माण करते, तसेच त्यांच्या आरोग्यावर व मानसिक विकासावर गंभीर परिणाम करते. या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनाच्या समन्वयातून ग्रामपातळीपर्यंत जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे.

नवजीवन संस्थेच्या वतीने नगर जिल्ह्यातील सुमारे १०० पेक्षा जास्त गावांमधून शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, पिण्याचे व शेतीसाठीचे पाणी, बचत गट विकास, ,अपारंपारिक ऊर्जेचा सुयोग्य वापर, एकलपालक मुलांसाठी बालसंगोपन योजना, बेघरांसाठी निवारागृह, निराधार मुलांसाठी बालगृह इत्यादी बाबींवर काम करण्यात येत आहे.

---

# राज्यस्तरीय माळी वधु-वर मेळाव्याचा समाजबांधवांनी लाभ घ्यावा - उपमहापौर ॲड. धनंजय जाधव

## रविवारी लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात माळी समाजबांधव एकवटणार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राज्यस्तरीय माळी वधू वर मेळाव्याचा लाभ समाजबांधवांनी घ्यावा. दोन कुटुंबांना जोडण्याचा व कुटुंब व्यवस्था टिकवण्यासाठी वधू वर मेळावे ही काळजी गरज आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात प्रत्यक्ष संवाद भेटी कमी झाल्या असून. मेळाव्याच्या माध्यमातून विवाह संस्था टिकून राहण्यास मदत होते, असे प्रतिपादन सातवे राज्यस्तरीय माळी वधू वर मेळाव्याचे स्वागताध्यक्ष तथा उपमहापौर धनंजय जाधव यांनी केले.

वधु-वर मेळाव्याच्या पूर्वतयारीच्या बैठकीत उपमहापौर ॲड. जाधव बोलत होते. यावेळी जनवार्ता जीवनसाथीचे ॲड. पोपट बनकर, लघुउद्योग, व्यवसाय, शेती व्यवसाय, स्वयंरोजगार करणाऱ्या विवाह इच्छुक युवकांना प्राधान्य दिले गेले पाहिजे. वधूंची नोंदणी मोफत असल्याने मोठ्या प्रमाणात वधूंची नोंदणी झाली असल्याचे सांगितले. घटस्फोटीत, विधवा, विधूर, दिव्यांग यांची देखील नोंदणी



मोठ्या प्रमाणात झालेली असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यस्तरीय माळी वधू-वर मेळावा २२ मार्च रोजी लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, टिळक रोड अहिल्यानगर येथे होणार आहे. या मेळाव्यात माजी महापौर भगवान फुलसौंदर, ज्येष्ठ नगरसेवक बाळासाहेब बोराटे, नगरसेविका सुजाता पडोळे, आश्विनी लोंढे, पुष्पा बोरुडे, वंदना ताठे, रूपाली दातरंगे, आशाताई डागवाले, सुनिता फुलसौंदर, दत्ता गाडळकर, मंगल लोखंडे, संतोष म्हस्के, नगराध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर, करण ससाणे, सुनीता खेतमाळीस, सरपंच सुनीता खेतमाळीस उद्योजक महेश झोडगे, जिल्हा परिषद सदस्य शरद झोडगे, अनिल झोडगे, अण्णासाहेब शेलार, प्रा. माणिक विधाते, उद्योजक उद्धवराव नेवसे, मंगल भुजबळ, उद्योजक शंकरराव नेवसे, सारंग पंधाडे, विनायक नेवसे, सरपंच राम पानमळकर, साहेबराव निधाने, ॲड. रवींद्र बोरावके, उत्तम नाना पाटील, आदिनाथ हजारे, सुभाष लोंढे, निखिल शेलार, गणेश आंबेकर, गोरक्षनाथ ओहोळ, संभाजीराव कोकाटे आदी उपस्थित राहणार असल्याचे कायदेविषयक सल्लागार ॲड. महेश शिंदे यांनी सांगितले.

मेळावा यशस्वीतेसाठी गणेश बनकर, प्रा. सिताराम जाधव, स्वाती डोमकावळे, ॲड. दिनेश शिंदे, जयश्री शिंदे, रामेश्वर राऊत, प्रा. संजय पडोळे, नितीन डागवाले, प्रा. सुनील शिंदे, ॲड. दिलीपराज शिंदे, शेखर होले, स्वाती बनकर, आश्विनी विधाते, सचिन मेहेत्रे, बाळासाहेब पुंड आदी परिश्रम घेत आहेत.

---

# समाज घडविण्यात महिला शिक्षकांची भूमिका महत्त्वाची - महापौर गाडे

## शहरातील महिला शिक्षकांचा सन्मान । रायझिंग ट्रायबल फाउंडेशन व महाराष्ट्र राज्य प्राथमिक-माध्यमिक शिक्षक-शिक्षकेतर संघटनेचा उपक्रम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रायझिंग ट्रायबल फाउंडेशन व महाराष्ट्र राज्य प्राथमिक-माध्यमिक शिक्षक-शिक्षकेतर संघटना, अहिल्यानगर जिल्हा यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त महिला मुख्याध्यापिका व शिक्षिकांचा सन्मान सोहळा महर्षी ग. ज. चितांबर विद्यामंदिर, भोपे सभागृह येथे उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाला अहिल्यानगर महानगरपालिकेच्या महापौर सौ. ज्योतीताई अमोल गाडे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच माजी नगरसेविका शितलताई जगताप, पोलीस निरीक्षक जयश्रीताई काळे आणि म.न.पा. शिक्षण विभागाचे प्रशासनाधिकारी जुबेर पठाण यांची विशेष उपस्थिती होती.



यावेळी मान्यवरांच्या हस्ते महिला मुख्याध्यापिका व शिक्षिकांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. आपल्या मनोगतात महापौर ज्योतीताई गाडे यांनी महिला शिक्षक समाज घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे सांगितले. नगरसेविका शितलताई जगताप यांनी महिला मुख्याध्यापिका व शिक्षिकांचा सन्मान हा प्रेरणादायी उपक्रम असल्याचे मत व्यक्त केले. तर पोलीस निरीक्षक जयश्रीताई काळे यांनी महिलांच्या सुरक्षेसाठी पोलीस यंत्रणा सदैव तत्पर असल्याचे सांगितले. शिक्षण विभागाचे प्रशासनाधिकारी जुबेर पठाण यांनी शहरातील शाळांच्या गुणवत्तेत शिक्षकांचे मोठे योगदान असल्याचे नमूद केले.

---

# ईदनिमित्त पैठणमध्ये उत्कृष्ट नियोजन; सामाजिक उपक्रमांनी सणाचा उत्साह द्विगुणित

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर पैठण शहरात प्रशासनाच्या सुयोग्य नियोजनासोबतच विविध सामाजिक उपक्रमांमुळे सणाचा उत्साह अधिकच वाढला आहे. ईदगाह मैदानावर नमाजासाठी येणाऱ्या भाविकांसाठी नगरपालिकेकडून यंदा अत्यंत व्यवस्थित सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

ईदगाह परिसरात भव्य मंडप, सुसज्ज ध्वनी व्यवस्था तसेच पिण्याच्या पाण्याची उत्तम सोय करण्यात आल्याने भाविकांना मोठा दिलासा मिळाला. मागील काही वर्षांच्या तुलनेत यंदाची व्यवस्था अधिक शिस्तबद्ध व परिणामकारक असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे. आमदार विलास (बापू) भुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली नगराध्यक्ष भूषण कावसानकर व उपनगराध्यक्ष तुषार पाटील यांनी स्वतः लक्ष घालून ही व्यवस्था उभारली.



दरम्यान, ईदनिमित्त शहरात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजनही करण्यात आले आहे. 'संकल्पदीप फाउंडेशन'तर्फे माहेश्वरी धर्मशाळा समोर सकाळी ७ वाजता रूह अफजा शरबत वाटपाचा उपक्रम राबविण्यात येत असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर एमआयएमचे शहराध्यक्ष निसार जमीर बागवान यांनी मुस्लिम समाजाच्या वतीने आमदार, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, सर्व नगरसेवक व नगरपालिका कर्मचाऱ्यांचे आभार मानले असून, सामाजिक उपक्रमांमुळे सणाचा आनंद अधिक वाढल्याची भावना व्यक्त केली.

---

(पान १ वरून)

## आरोपीला तात्काळ अटक करा - आमदार संग्राम जगताप

लेखी अहवाल तात्काळ सादर करावा, अशीही त्यांनी मागणी केली. आमदार संग्राम जगताप यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, ''येत्या बुधवारपर्यंत आरोपीला अटक झाली नाही, तर सराफ सुवर्णकार संघटनेच्या माध्यमातून तीव्र आंदोलन छेडले जाईल. नागरिकांच्या सुरक्षेच्या प्रश्नावर कुठलीही तडजोड केली जाणार नाही.

## शहरात रमजान ईद उत्साहात साजरी

कोठला येथील ईदगाह मैदानावर सकाळी १० वाजता सामुदायिक नमाज अदा करण्यात आली. मौलाना नदिम अख्तर यांच्या मार्गदर्शनाखाली नमाज पठण झाले. नमाजसाठी शहरातील विविध भागांमधून मुस्लिम बांधव अबालवृद्धांसह मोठ्या संख्येने उपस्थित होते. हजारो भाविकांनी एकत्र येऊन नमाज अदा केल्याने ईदगाह मैदान परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

याशिवाय शहरातील विविध मशिदींमध्येही सकाळी ७ वाजल्यापासून ईदच्या नमाजची व्यवस्था करण्यात आली होती. अनेक मशिदींमध्ये भाविकांनी उत्साहाने नमाज अदा केली. सामुदायिक नमाजनंतर धार्मिक एकात्मता, शांतता आणि देशाच्या प्रगतीसाठी अल्लाहच्या चरणी विशेष प्रार्थना करण्यात आली.

ईदचा सण शांततेत आणि सुव्यवस्थित पार पडावा यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने ईदगाह मैदानासह शहरातील विविध भागात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कोठला परिसरातून जाणारी वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली होती.

## गोमांस विक्री करणारे चौघे झेंडीगेट परिसरातून ताब्यात

या ठिकाणी पथकाने १ लाख ७० हजार ६००/ रुपये. किंमतीचे पाचशे किलो गोमांस जप्त केले. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २७१, महाराष्ट्र प्राणीरक्षा अधिनियम सन १९९५ चे सुधारीत सन २०१५ चे कलम ५ (क), ९(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. पुढील तपास पोहेकॉ विनोद बोरगे हे करीत आहेत.

## महायुती सरकार शेतकऱ्यांच्या बाबतीत संवेदनशील - आमदार दाते सर

भरपाई मिळवून देण्यासाठी पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रसंगी कृषी अधिकारी मयुरी गोरे, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, सुभाषराव दुधाडे, डॉ. भाऊसाहेब खिल्लारी, उपसरपंच बबनराव पवार, बाबाजी चौधरी, लिंबाशेठ चौधरी, चेअरमन देविदास फलके, सुभाष सासवडे, दीपक भागवत, गोविंद कुटे, संतोष थोरात, सुधाकर गावडे, प्रकाश (नंदू) वाघ, अमोल ठाणगे, भिकाजी वाघ, किरण वाळुंज, भाऊसाहेब चौधरी, अण्णा वाघ, किसन वाघ, संतोष वाघ, भीमाजी देशमुख, निलेश चौधरी, जयसिंग वाघ, सुरेश देशमुख, गणेश विरोळे, बाबासाहेब वाघ, नवनाथ वाघ, वैभव शिंदे, नागेश शेळके, दीपक देशमुख, रामा देशमुख, सि.टी. देशमुख, निंबा देशमुख, प्रदीप वाघ, आबा वाघ, बाळकृष्ण चौधरी, संदीप वाघ, सुभाष शिंदे, उत्तम शिंदे, शिवाजी वाघ, तुळशीराम शिंदे, बाळकृष्ण वाघ, दत्तात्रय वाघ, शरद वाघ, मिनीनाथ शेळके, राजाराम वाघ, लिंबा देशमुख यांसह परिसरातील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.